क्रमांक-आस्था/ १३६७/२०१५.
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
३ रा मजला, धर्मादाय आयुक्त भवन,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दिनांक - 15 APR 2015

-:**परिपत्रक**:- क्र. ४१८, दि. १५.४.२०१५

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की, धर्मादाय संघटनेतील प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख विविध प्रकरणात किरकोळ बाबींसाठी या कार्यालयाकडे प्रस्ताव मार्गदर्शनास्तव सादर करीत असतात. त्यामुळे सदरहू प्रकरणे नाहक प्रलंबित राहतात.

तरी, याद्वारे सर्व विभागीय कार्यालयातील कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, यापुढे या कार्यालयास मार्गदर्शनास पाठविण्यात येणा-या प्रकरणांबाबत आपले स्तरावर शासन निर्णयाचा सविस्तर अभ्यास करुन निर्णय घेण्यात यावा. आवश्यक प्रकरणी कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव मुख्यालयास पाठवावा. त्याचप्रमाणे कर्मचा-यांच्या रजा व गैरहजेरी (६० दिवसाखालील) रजा बाबत आपल्या स्तरावर निर्णय घेण्यात यावा. ६० दिवसांवरील रजेबाबतचे प्रस्ताव मुख्यालयास पाठविण्यात यावेत.

**धर्मादाय आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत:-
३. धर्मादाय संघटनेतील सर्व कार्यालय प्रमुख.
४. निवड नस्ती.

CO/HO/D:/Shashi/karyalayin aadesh/